# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील सिंहगडरोड पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक ०९/११/२०१६

सिंहगडरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे प्रविण सुनिल हांडे, वय ३० वर्षे, रा. काशिबाई सदन, दुसरा मजला, नवले शाळेजवळ, न-हे रोड, पुणे यास मुंबई पोलीस ॲक्ट कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ३८/२०१६ दिनांक ०९/११/२०१६ रोजी एक वर्षा करीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसमाविरुध्द जखमी करणे, शिवीगाळ करुन हाताने मारहाण करणे, प्राणघातक शस्त्र घेवून बेकायदेशिर जमावात सामील होणे, प्राणघातक शस्त्र घेवून दंगा करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे, नुकसान करणे, रस्ता आडविणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे इ. प्रकारचे गंभीर गुन्हे सिंहगडरोड पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत. त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन एक वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## प्रेस नोट

**परीमंडळ २ पुणे शहर विभागातील सहकारनगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- ०९/११/२०१६

सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे शंकर उर्फ विकी सत्यवान नेटके, वय २२ वर्षे, रा. लुंकड शाळेजवळ, तळजाई वसाहत, पद्मावती पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ३९/२०१६ दिनांक ०९/११/२०१६ रोजी दोन वर्षा करीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम प्राणघातक हत्यारांसह बेकायदेशिर जमावात सामील होणे, प्राण घातक शस्त्रानिशी दंगा करणे, जखमी करणे, सामाईक इरादा, बेकायदेशिर जमावात सामील होणे, समान उदिष्ट साधण्यासाठी बेकायदेशिर जमावात समील होणे, शिवीगाळ करुन धमकी देणे, पळवून नेणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द सहकारनगर आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील दत्तवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक ०९/११/२०१६

दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे सागर तानाजी अडसूळ, वय २७ वर्षे, रा. ३८/१ पर्वती दर्शन पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ३७/२०१६ दिनांक ०९/११/२०१६ रोजी दोन वर्षा करीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम दरोडा घालण्याची पुर्व तयारी करणे, दरोडा घालण्यासाठी एकत्र जमणे, अनधिकृतपणे शस्त्र जवळ बाळगणे, तडीपार प्रतिबंधक क्षेत्रात प्रवेश करुन राहणे, जुलमाने घेण्यासाठी भिती घालणे, जिवे मारण्याची किंवा जबर दुखापत करण्याची भिती घालून जुलमाने घेणे, गंभीर जखमी करणे, शिवीगाळ करुन हाताने मारहाण करणे, सामाईक इरादा, खून करण्याचा प्रयत्न करणे, नुकसान करण्याच्या उद्देशाने जाळपोळ करणे, सरकारी नोकराला दुखापत करुन कर्तव्यापासून परावृत्त करणे, सरकारी नोकरावर हमला करुन कर्तव्यात अडथळा आणणे बेकायदेशिर जमाव जमवून दंगा करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द मार्केटयार्ड आणि दत्तवाडी पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.